महसूल विभागाच्या अधिनस्त अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्याच्या अनुषंगाने सक्षम प्राधिकारी घोषित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल विभाग,
शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-२०२६/प्र.क्र.८३/आस्था-४
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक:- ०६/११/२०२६

संदर्भ:

१. शासन निर्णय क्र. सामान्य प्रशासन विभाग, क्र. वशिअ-२०२५/प्र.क्र.१७/विचौ-१, दि.७/४/२०२५.
२. शासन परिपत्रक क्र. सामान्य प्रशासन विभाग, क्र. वशिअ-२०२५/प्र.क्र.१७/विचौ-१, दि.२५/८/२०२५.
३. शासन परिपत्रक महसूल व वन विभाग क्र. डीपोई-२०१५/प्र.क्र.३१०/ई-९, दि. ०५/१२/२०१५.

प्रस्तावना:

शासकीय कर्तव्ये पार पाडीत असतांना शासकीय कर्मचाऱ्यांकडून घडलेल्या अपराध, गैरवर्तणूक किंवा गैरवर्तनाच्या अनुषंगाने जेव्हा महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ अनुसार शिस्तभंगाची कार्यवाही करण्याचे योजिले जाते, तेव्हा अशी शिस्तभंगविषयक कारवाई करतांना ती सक्षम प्राधिकाऱ्याने निदेशित करणे अत्यावश्यक आहे. अन्यथा, सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेशिवाय आदेशीत केलेली विभागीय चौकशीची कारवाई तसेच देण्यात आलेली शिक्षा विधी अग्राहय ठरते व त्यामुळे अपराध सिध्द होवूनही संबंधित अपचाऱ्यास दिलेल्या शिक्षेची अंमलबजावणी होत नाही.

शिस्तभंग विषयक कारवाईच्या अनुषंगाने अनुच्छेद ३११ च्या खंड (१) अनुसार बडतर्फी व सेवेतून काढून टाकण्याची शिक्षा देण्याचे अधिकार संबंधिताच्या नियुक्ती प्राधिकाऱ्यापेक्षा दुय्यम प्राधिकाऱ्यास नाहीत, अन्य शिक्षांच्या बाबतीत नियुक्ती अधिकाऱ्यास दुय्यम असलेल्या अधिकाऱ्याकडे अधिकार सोपविता येतात. या अनुषंगाने, सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांचे नियंत्रणाखालील अधिकारी/कर्मचारी यांचेकरीता विहित केलेल्या विवरणपत्रानुसार शिस्तभंगविषयक प्राधिकारी कोण राहतील याबाबतचे आदेश निर्गमित करणेबाबत सामान्य प्रशासन विभागाने संदर्भ क्र. १ येथील दि.७/४/२०२५ रोजीच्या परिपत्रकान्वये सूचित केले आहे.

महसूल व वन विभागाच्या ५ डिसेंबर २०१५ च्या परिपत्रकानुसार, विभागीय आयुक्त यांना नायब तहसीलदार, गट-ब (राजपत्रित) संवर्गातील अधिकाऱ्यांविरुद्ध नियम ८ अंतर्गत चौकशी व किरकोळ शिक्षेचे अधिकार आहेत, परंतु, जबर शिक्षा किंवा सेवानिवृत्तांच्या प्रकरणी अंतिम मंजुरीसाठी प्रस्ताव शासनाकडे पाठविणे आवश्यक आहे. नायब तहसीलदार संवर्ग आता राज्य स्तरीय संवर्ग घोषित करण्यात आला असल्याने व त्यांचे नियुक्ती प्राधिकरण शासन असल्याने, त्यांच्या विभागीय चौकशी व अंतिम कारवाईचे अधिकारही शासन स्तरावरच विहित असणे आवश्यक आहे, जेणेकरून प्रशासकीय सुसूत्रता राहून कायदेशीर अडचणी टळू शकतील.

सामान्य प्रशासन विभागाने सूचित केल्यानुसार महसूल विभागाच्या अधिनस्त अधिकारी/कर्मचारी यांचेकरीता शिस्तभंगविषयक कारवाईच्या अनुषंगाने सक्षम प्राधिकारी घोषित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय:-

महसूल विभागाच्या अधिनस्त सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी शिस्तभंगविषयक कारवाईच्या अनुषंगाने पुढील विवरणपत्रात नमूद केल्याप्रमाणे सक्षम शिस्तभंगविषयक प्राधिकारी घोषित करण्यास मान्यता देण्यात येत आहे:-

अ. क्र.	**पदनाम, गट (अ/ब/क/ड)**	**नियुक्ती प्राधिकारी**	**किरकोळ शिक्षा करण्यास सक्षम प्राधिकारी**	**जबर शिक्षा करण्यास सक्षम प्राधिकारी**	**अपिलीय प्राधिकारी**
१.	अपर जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) गट-अ	मा. मुख्यमंत्री	मा. मुख्यमंत्री	मा. मुख्यमंत्री	मा.राज्यपाल
२.	अपर जिल्हाधिकारी गट-अ	मा. मुख्यमंत्री	मा. मुख्यमंत्री	मा. मुख्यमंत्री	मा.राज्यपाल
३.	उपजिल्हाधिकारी (निवडश्रेणी) गट-अ	मा. मुख्यमंत्री	मा. मुख्यमंत्री	मा. मुख्यमंत्री	मा.राज्यपाल
४.	उपजिल्हाधिकारी, गट-अ	मा.मंत्री (महसूल)	मा.मंत्री (महसूल)	मा.मंत्री (महसूल)	मा.राज्यपाल
५.	तहसीलदार, गट-अ	मा.मंत्री (महसूल)	मा.मंत्री (महसूल)	मा.मंत्री (महसूल)	मा.राज्यपाल
६.	नायब तहसीलदार, गट-ब (राजपत्रित)	मा.मंत्री (महसूल)	मा.मंत्री (महसूल)	मा.मंत्री (महसूल)	मा.राज्यपाल
७.	उच्चश्रेणी लघुलेखक, गट-ब (अराजपत्रित)	विभागीय आयुक्त	विभागीय आयुक्त	विभागीय आयुक्त	मा.मंत्री (महसूल)
८.	निम्नश्रेणी लघुलेखक, गट-ब (अराजपत्रित)	विभागीय आयुक्त	विभागीय आयुक्त	विभागीय आयुक्त	मा.मंत्री (महसूल)
९.	मंडळ अधिकारी गट-क (अराजपत्रित)	जिल्हाधिकारी	जिल्हाधिकारी	जिल्हाधिकारी	विभागीय आयुक्त
१०.	ग्राम महसूल अधिकारी गट-क	जिल्हाधिकारी	जिल्हाधिकारी	जिल्हाधिकारी	विभागीय आयुक्त
११.	लघुटंकलेखक, गट-क	जिल्हाधिकारी	जिल्हाधिकारी	जिल्हाधिकारी	विभागीय आयुक्त
१२.	सहाय्यक महसूल अधिकारी, गट-क	जिल्हाधिकारी	जिल्हाधिकारी	जिल्हाधिकारी	विभागीय आयुक्त
१३.	महसूल सहायक, गट-क	जिल्हाधिकारी	जिल्हाधिकारी	जिल्हाधिकारी	विभागीय आयुक्त

१४.	वाहनचालक, गट-क	जिल्हाधिकारी	जिल्हाधिकारी	जिल्हाधिकारी	विभागीय आयुक्त
१५.	शिपाई, गट-ड	जिल्हाधिकारी	जिल्हाधिकारी	जिल्हाधिकारी	विभागीय आयुक्त

०२. या शासन निर्णयाच्या दिनांकापासून पुढे उद्भवणारी नायब तहसीलदार, गट-ब (राजपत्रित) संवर्गाची शिस्तभंगविषयक संपूर्ण कार्यवाही, चौकशी आणि शिक्षेचे अधिकार शासन स्तरावर विहित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

०३. या शासन निर्णयाच्या दिनांकापासून पुढे उद्भवणारी नायब तहसीलदार, गट-ब (राजपत्रित) संवर्गातील अधिकाऱ्यांविरुद्धची सर्व नवीन शिस्तभंगविषयक प्रकरणे सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांनी तात्काळ शासनाकडे वर्ग करावीत.

०४. या शासन निर्णयाच्या दिनांकापूर्वी नायब तहसीलदार, गट-ब (राजपत्रित) संवर्गातील अधिकाऱ्यांविरुद्ध सुरू असलेल्या शिस्तभंगविषयक प्रकरणांबाबत महसूल व वन विभाग शासन परिपत्रक क्र. डीपीई-२०१५/प्र.क्र.३१०/ई-९, दिनांक ५ डिसेंबर २०१५ नुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

०५. सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांनी सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी काटेकोरपणे होईल याची सुनिश्चिती करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०२६११०६१३००२८७९४८ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

MAHESH ASHOKRAO VARUDKAR

Digitally signed by MAHESH ASHOKRAO VARUDKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=D93C4961D98086877A4048296211D7AF97ECFD40D7967C43D20B360D83CE0FA6, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7E8B8C3712E8D459EF90BF7AAE4EA46E9CAEBDD50CFECDE2EE7CE0454FA0416A, cn=MAHESH ASHOKRAO VARUDKAR
Date: 2026.11.06 17:16:31 +05'30'

(महेश वरुडकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन मलबार हिल मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव.
४) मा. सभापती/ उप सभापती/ विरोधी पक्षनेते (विधानसभा) यांचे सचिव.
५) मा. सभापती/ उप सभापती/ विरोधी पक्षनेते (विधानपरिषद) यांचे सचिव.
६) मा.मंत्री (महसूल) महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
७) मा.राज्यमंत्री (महसूल) महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
८) सर्व मा. मंत्री/मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
९) सर्व मा. विधानपरिषद सदस्य/ विधानसभा सदस्य
१०) मा. मुख्य सचिव महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२.

११) अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१२) नोंदणी महानिरीक्षक तथा मुद्रांक नियंत्रक, पुणे.
१३) जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.रा.), पुणे.
१४) सर्व विभागीय आयुक्त.
१५) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग.
१६) सर्व जिल्हाधिकारी.
१७) सर्व उपजिल्हाधिकारी/उपविभागीय अधिकारी.
१८) सर्व तहसीलदार.
१९) सर्व उपसचिव/सहसचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२०) सर्व कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२१) कार्यासन आस्था-४/४अ/७/१० संग्रहार्थ.